**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 11.05.2025** **वार- रविवार**

---

**संमेलन**

विश्व संवाद केंद्राच्या वतीनं आज पुण्यात महिला माध्यमकर्मी संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. दिवसभराच्या या संमेलनाचं उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार डॉक्टर उदय निरगुडकर यांच्या हस्ते झालं; तर संमेलनाचा समारोप राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांच्या उपस्थितीत झाला. मुद्रित माध्यमासह, नभोवाणी, दूरचित्रवाणी आणि डिजिटल माध्यमात काम करणाऱ्या महिला पत्रकारांनी यात सहभाग घेतला.

**अन्न-औषध-प्रशासन**

राज्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ होत असल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनाच्या  म्हणजेच एफडीए च्या  अहवालातून समोर आली आहे. एफडीएनं गेल्या शंभर दिवसांमध्ये राज्यातील दुध आणि दुग्धजन्य पदार्थांची तपासणी करण्यासाठी 5176 नमुन्यांचं संकलन केलं, यात 419 नमुने कमी दर्जाचे, 185 असुरक्षित आणि 8 नमुन्यांमध्ये छापील माहिती चुकीची असल्याचं समोर आलं आहे. राज्य सरकारनं प्रत्येक विभागाला शंभर दिवसांचा कार्यक्रम राबविण्याचे आदेश दिले होते. एफडीएच्या शंभर दिवसांच्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.

**पाणी-मीटर**

पुणे शहरातील ज्या भागांमध्ये पाण्याचे मीटर बसविण्याचं काम पूर्ण झालं आहे, तेथील नागरिकांकडून मीटर रीडिंगनुसार पाणीपट्टी घेण्यास मान्यता द्यावी, असा प्रस्ताव पुणे महापालिकेच्या  पाणीपुरवठा विभागानं मान्यतेसाठी ठेवला आहे. मात्र, गेल्या महिन्यापासून या प्रस्तावावर चर्चाच झाली नसल्यानं अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आला नाही.

**वाहतूक-नियम**
पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून शहरातील 10 लाखांहून अधिक शालेय विद्यार्थ्यांना रस्ते सुरक्षा नियमांचं महत्त्व पटवून देण्यात येणार आहे. 'रोड सेफ्टी ट्रेक' या नविन उपक्रमाद्वारे, लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता रुजवली जाणार आहे. येत्या 1 जूनपासून सुरू होणाऱ्या या कार्यक्रमात इयत्ता 5 वी ते 10 वीचे विद्यार्थी सहभागी होतील. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना सुरक्षित वाहतुकीचं महत्त्व पटवून देणं हे आमचं ध्येय आहे असं पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी  अर्चना गायकवाड यांनी  सांगितलं.

**प्राणी-गणना**
वनविभागाच्या वतीनं दरवर्षी वैशाख पौर्णिमा अर्थात बुध्द पौर्णिमेला शासकीय यंत्रणा आणि वन्य जीव तज्ज्ञांच्या सहभागातून प्राणी गणना होते. कारण या पौर्णिमेला रात्रीचा कालावधी मोठा आणि चंद्रबिंबही खूप मोठं असतं. मात्र यंदा सर्वत्र ढगाळ वातावरणामुळं प्राणी गणनेत मोठा अडसर निर्माण झाला आहे. तरीही वनविभागानं विविध ठिकाणी प्राणी गणनेसाठी तयारी केली आहे.
राज्यातील सर्व जंगलात एकंदर सुमारे 10 हजार पेक्षा जास्त मचाण बांधण्यात आले आहेत. हे सर्व मचाण पंधरा दिवस आधीच आरक्षित झाले आहेत.

**मातृदिन**
मुलांचं भावनिक भरणपोषण करणारी आई हे जगातलं सर्वोत्तम विद्यापीठ आहे, असं मत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्राध्यापक मिलिंद जोशी यांनी व्यक्त केलं.
जागतिक मातृदिनानिमित्त जय गणेश व्यासपीठ, पुणेतर्फे आज विघ्नहर्ता कार्यकर्ता मातृगौरव सन्मान सोहळ्याचं मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इथं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी जोशी बोलत होते. शहराच्या विविध भागातील 21 मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या मातांचा या वेळी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**सम्यक पुरस्कार**
आंबेडकरी चळवळ नेटानं पुढे चालविणाऱ्या तसंच विविध सामाजिक क्षेत्रात कार्य करत असलेल्या कार्यकर्त्यांचा नुकताच पुण्यात सम्यक पुरस्कारानं गौरव करण्यात आला. तथागत गौतम बुध्द, चक्रवर्ती सम्राट अशोक, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आणि खासदार ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त हे सम्यक पुरस्कार प्रदान करण्यात आले; या पुरस्काराचं यंदाचं 17 वं वर्ष आहे.

**होर्डिंग**
अवकाळी पावसामुळं जाहिरात फलक कोसळून दुर्घटना होऊ नये यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं 15 मे ते 15 जून या कालावधीत शहरात कुठेही फलक लावू नयेत असे आदेश जारी करण्यात आले होते मात्र आता हा कालावधी 25 मे ते सात जून असा 14 दिवसांचा मर्यादित करण्यात आला आहे. यासंदर्भात संबंधित जाहिरात कंपन्या आणि महापालिकेच्या आकाश चिन्ह आणि परवाना विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

**बाजार भाव**
पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध राज्यातून ऐंशी ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक घटल्यानं  फ्लॉवर, गाजर, सिमला मिरची आणि शेवगा महागला आहे. फळबाजारात आंब्यांची आवक वाढली आहे. फुलबाजारात सुट्ट्या फुलांना मागणी असली तरी आवकही चांगली झाल्यानं दर स्थिर आहेत.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज दुपारनंतर ढगाळ वातावरण असून आज कमाल तापमान 36 तर किमान तापमान 22 पूर्णांक 3 दशांश अंश सेल्सिअस होतं. उद्याही तापमान असंच असेल आणि सोसाट्याच्या वाऱ्यांसह हलका पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**